# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – ६

## सभावृत्तांत

दिनांक – २०.०७.२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जुलै-२०१७ ची मा.महापालिका सभा गुरुवार दि.२०.०७.२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे महापौर
२) मा.शैलजा अविनाश मोरे उपमहापौर
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
५) मा.साधना अंकुश मळेकर
६) मा.दत्तात्रय बाबूराव साने
७) मा.अश्विनी संतोष जाधव
८) मा.सारीका शिवाजी सस्ते
९) मा.राहुल गुलाब जाधव
१०) मा.वसंत प्रभाकर बोराटे
११) मा.बुर्डे सुवर्णा विकास
१२) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
१३) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
१४) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१५) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
१६) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
१७) मा.गायकवाड निर्मला मनोज
१८) मा.सागर बाळासाहेब गवळी
१९) मा.गोफणे अनुराधा देविदास
२०) मा.बारसे प्रियांका प्रविण

२१) मा.अजित दामोदर गव्हाणे

२२) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२३) मा.लांडगे सारिका संतोष

२४) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२५) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२७) मा.फुगे भिमाबाई पोपट

२८) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२९) मा.सावळे सिमा रविंद्र

३०) मा.लोंढे नम्रता योगेश

३१) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३२) मा.लांडे विक्रांत विलास

३३) मा.गीता सुशिल मंचरकर

३४) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३५) मा.अनुराधा गणपत गोरखे

३६) मा.केशव हनुमंत घोळवे

३७) मा.मंगला अशोक कदम

३८) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३९) मा.अश्विनी भिमा बोबडे

४०) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४१) मा.संजय बबन नेवाळे

४२) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४३) मा.भालेकर प्रविण महादेव

४४) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४५) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४६) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४७) मा.घोलप कमल अनिल

४८) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४९) मा.पवळे सुमनताई मधुकर

५०) मा.चिखले सचिन तुकाराम

५१) मा.जावेद रमजान शेख

५२) मा.यादव मीनल विशाल

५३) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५४) मा.प्रमोद कुटे

५५) मा.राजू मिसाळ

५६) मा.बाबर शर्मिला राजू

५७) मा.अमित राजेंद्र गावडे

५८) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५९) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

६०) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

६१) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६२) मा.ढाके नामदेव जनार्दन

६३) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६४) मा.करुणा शेखर चिंचवडे

६५) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६६) मा.भोईर सुरेश शिवाजी

६७) मा.अपर्णा निलेश डोके

६८) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६९) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

७०) मा.जयश्री वसंत गावडे

७१) मा.कोमल दिपक मेवाणी

७२) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७३) मा.सुलक्षणा राजू धर

७४) मा.शाम गणपतराव लांडे

७५) मा.सुजाता सुनिल पालांडे

७६) मा.योगेश मंगलसेन बहल

७७) मा.कदम निकीता अर्जुन

७८) मा.संदिप बाळकृष्ण वाघेरे

७९) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८०) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

८१) मा.पाडाळे निता विलास

८२) मा.काळे उषा दिलीप

८३) मा.कोकणे संतोष अंकुश

८४) मा.पवार मनिषा प्रमोद

८५) मा.बारणे अर्चना तानाजी

८६) मा.अभिषेक गोविंद बारणे

८७) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८८) मा. अॅड.भोसले सचिन सुरेश

८९) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९०) मा.बारणे माया संतोष

९१) मा.निलेश हिरामण बारणे

९२) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९३) मा.दर्शले रेखा राजेश

९४) मा.कलाटे राहुल तानाजी

९५) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९६) मा.ममता विनायक गायकवाड

९७) मा.कामठे तुषार गजानन

९८) मा.चोंधे आरती सुरेश

९९) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

१००) मा.सविता बाळकृष्ण खुळे

१०१) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०२) मा.कुटे निर्मला संजय

१०३) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०४) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०५) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०६) मा.मुंढे उषा अंकुश

१०७) मा.कदम शशिकांत गणपत

१०८) मा.लोखंडे चंदा राजू

१०९) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

११०) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१११) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

११२) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

११३) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११४) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११५) मा.नवनाथ दत्तू जगताप

११६) मा.संतोष बबन कांबळे

११७) मा.सोनवणे शारदा हिरेन

११८) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११९) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१२०) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२१) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२२) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर- महापालिका आयुक्त, मा.अच्युत हांगे-अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.गावडे-सहआयुक्त, मा,पाटील, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.खोराटे, मा.कडूसकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर-सहा.आयुक्त, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.निकम, मा.इंगळे, मा.बरशेट्टी, मा.गलबले, मा.कांबळे - कार्यकारी अभियंता, मा.लावंड- कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

------

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, श्रीनगरमध्ये झालेल्या गोळीबारात सीआरपीएफचा शहीद झालेला एक जवान, अमरनाथ यात्रेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत पावलेले ७ भाविक, अमरनाथ यात्रा भाविकांची बस दरीत कोसळून मृत पावलेले १७ भाविक, नायक संदिप जाधव व शिपाई सावन माने - जम्मु काश्मीर मधील पुंच भागात पाकिस्तानी सैनिकांनी केलेल्या हल्ल्यात शहिद झालेले जवान, माधवराव चिलेकर- दैनिक सकाळचे सहयोगी संपादक अविनाथ चिलेकर यांचे वडील, मोहम्मद आयुब पंडीत- श्रीनगरमधल्या प्राचीन जामिया मशिदीबाहेर फुटीरवाद्यांच्या हल्ल्यात शहीद, प्रा.मधुकर तोरडमल- जेष्ठ अभिनेते, मंगेश तेंडुलकर- जेष्ठ व्यंगचित्रकार, अजय पडवळ - पुण्यातील प्रसिद्ध सायकलपटु यांचे लेह येथे अपघाती निधन, इंदुताई पाटणकर - स्वातंत्र्यसेनानी, सामाजिक कार्यकर्त्या, उमा भेंडे - जेष्ठ अभिनेत्री, रमेश साहेबराव कदम- माजी सैनिक, भिकुदाजी भिलारे गुरुजी- स्वातंत्र्य सैनिक व माजी आमदार अक्का परशुराम लोंढे, श्रीमती रखुमाबाई कृष्णा उर्फ किसन भालेकर यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.केशव घोळवे –** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.आरती चोंधे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १

दिनांक – २०/७/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव-

२) मा.स्थायी समिती ठ.क्र.६०९ दि.०५/०७/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत इ. १० वी व १२ वी च्या गुणवंत विदयार्थ्यांना बक्षिस रक्कम देणे ही योजना कार्यरत आहे. सदर योजनेत खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेत यावी.

अ) इ. १० वी मध्ये ८०% ते ९०% गुण प्राप्त करणा-या विदयार्थ्यांना र.रु. १०,०००/- व ९०% पेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विदयार्थ्यांना र.रु. १५,०००/-

ब) इ.१२ वी मध्ये ८०% पेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विदयार्थ्यांना र.रु.१५,०००/-

सदरचा विषय हा धोरणात्मक असल्याने ही योजना सुरु करणेकामी विलंब होऊ नये यासाठी मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर वरील प्रमाणे करण्यात आलेल्या दुरुस्तीसह सदरच्या योजनेची अंमलबजावणी करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.निर्मला कुटे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.महापौर -** विषयपत्रीकेवरील विषय झाल्यानंतर सर्वांना शहरातील प्रश्नावर चर्चा करण्यासाठी वेळ देणार आहोत त्यामुळे पहील्यांदा विषय घेवू नंतर चर्चा करु.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- इयत्ता १२ वी मध्ये ८०% व ८०% पेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विदयार्थ्यासह र.रु. १५,०००/- बक्षिस देण्यास मान्यता देणेत यावी तसेच मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२ दि.२०/०६/२०१७ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यास मान्यता देणेत यावी महापालिकेचे अधिकार स्थायी समितीस प्रदान करण्यास मान्यता देणेत यावी तसेच – या वाक्यापुढे महसुली लेखाशिर्षातुन इतर भांडवली व महसुली लेखाशिर्षात रकमा वर्ग करण्याचे अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यात येत आहे व – या वाक्यापुर्वी – तसेच अंदाजपत्रक दोन मधील भाग-३ मधील अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.अर्चना बारणे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.आरती चोंधे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ४९ विषय क्रमांक – १

दिनांक – २०/७/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव-
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.६०९ दि.०५/०७/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत इ. १० वी व १२ वी च्या गुणवंत विदयार्थ्यांना बक्षिस रक्कम देणे ही योजना कार्यरत आहे. सदर योजनेत खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेत यावी.

अ) इ. १० वी मध्ये ८०% ते ९०% गुण प्राप्त करणा-या विदयार्थ्यांना र.रु. १०,०००/- व ९०% पेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विदयार्थ्यांना र.रु. १५,०००/-

ब) इ.१२ वी मध्ये ८०% पेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विदयार्थ्यांना र.रु.१५,०००/-

सदरचा विषय हा धोरणात्मक असल्याने ही योजना सुरु करणेकामी विलंब होऊ नये यासाठी मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर वरील प्रमाणे करण्यात आलेल्या दुरुस्तीसह सदरच्या योजनेची अंमलबजावणी करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच इयत्ता १२ वी मध्ये ८०% व ८०% पेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विदयार्थ्यासह र.रु. १५,०००/- बक्षिस देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२ दि.२०/०६/२०१७ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे महापालिकेचे अधिकार स्थायी समितीस प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच – या वाक्यापुढे महसुली लेखाशिर्षातुन इतर भांडवली व महसुली लेखाशिर्षात रकमा वर्ग करण्याचे अधिकार आयुक्तांना

प्रदान करण्यात येत आहे व – या वाक्यापुर्वी – तसेच अंदाजपत्रक दोन मधील भाग-३ मधील अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.आरती चोंधे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – २

दिनांक – २०/७/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माजसं/२/कावि/३४२/२०१७, दि.३१/०५/२०१७

२) मा. विधी समिती सभा ठराव क्र.१२ दि.१६/६/२०१७

प्रसार माध्यम प्रतिनिधींना वितरीत करावयाच्या मोफत बस प्रवास पासेसबाबत आकारावयाच्या रक्कमेबाबत (राज्यशासनाकडून प्राप्त झालेले अधिस्वीकृती ओळखपत्रधारक पत्रकरांना वार्षिक रकमेच्या १०% रक्कम स्विकारून व अधिस्विकृती ओळखपत्र नसलेल्या प्रसार माध्यम पत्रकारांकरिता वार्षिक रक्कमेच्या २५% रक्कम स्विकारून सवलत देणेबाबत)

**नियम व अटी:-**

१. राज्य शासनाकडून वितरीत केल्या जाणा-या अधिस्विकृती ओळखपत्रधारक असल्यास सदर प्रसारमाध्यम प्रतिनिधींना वार्षिक बसपास रकमेच्या १०% रक्कम अधिक मी-कार्डचे र.रु.८०/- मनपा कोषागारात जमा केल्यावर जमा रकमेची पावती सादर केल्यानंतर पास प्रक्रिया पूर्ण करावी.
२. अधिस्विकृती ओळखपत्र नसल्यास पास रकमेच्या एकूण वार्षिक रकमेपैकी २५% अधिक मी-कार्डचे र.रु.८०/- रक्कम मनपा कोषागारात जमा केल्यावर जमा रकमेची पावती सादर केल्यानंतर पास प्रक्रिया पूर्ण करावी.
३. दैनिक/साप्ताहिकांचे अंक नियमित मनपाकडील महत्वाच्या विभागांमध्ये वितरीत होणे आवश्यक राहील. दैनिक/साप्ताहिक/इलेक्ट्रोनिक प्रसारमाध्यमांमधील प्रतिनिधी यांची मनपाच्या विविध पत्रकार परिषदा,कार्यक्रमांना उपस्थिती व आवश्यक प्रसिद्धी होणे आवश्यक राहील. तसेच प्रसिद्धी करण्यात आलेल्या वृत्तांचे वृत्तपत्रे मनपाकडील महत्वाच्या विभागांमध्ये नियमित वितरीत करणे आवश्यक राहील.
४. दैनिक/साप्ताहिक/इलेक्ट्रोनिक प्रसारमाध्यमांकडील फक्त एका प्रतिनिधीस पास देण्यात येईल.
५. ज्या पत्रकारास पास द्यावयाचा आहे अशा पत्रकाराची पिंपरी चिंचवड महानगरपालिका वार्तांकनाकरीता नियुक्ती करण्यात आले असल्याचे मा.संपादक यांचे पत्र.

६. इलेक्ट्रॉनिक वाहिन्या संदर्भात संबंधित इलेक्ट्रॉनिक वाहिनीचे प्रसारण किमान स्थानिक पातळीवर होणे आवश्यक आहे. तसेच संबंधित प्रतिनिधींनी पिंपरी मनपाकडील वार्तांकन करणे/प्रत्यक्ष संपर्क साधणे आवश्यक आहे.

७. वरीलप्रमाणे दैनिक/साप्ताहिके/इलेक्ट्रॉनिक वाहिन्यांचे प्रतिनिधींनी मागील किमान सहा महिन्याचे कालावधीत मनपा मुख्य कार्यालय/अन्य कार्यालये कडील वार्तांकन/छायाचित्रण केलेले असणे आवश्यक आहे.

८. पिंपरी मनपा मुख्य भवनात येणारे प्रसिध्दी माध्यमांचे प्रतिनिधी, पिंपरी मनपा वार्तांकन, छायाचित्रण करणारे प्रतिनिधींचे बाबतीत पिंपरी मनपातील माहिती व जनसंपर्क विभागाने वरीलप्रमाणे निकषास अनुसरुण पास देणेबाबत प्रक्रिया करावी.

९. वरीलप्रमाणे निकषात बदल करणे, नवीन निकष समाविष्ट करणे, रद्द करणे, पासा संदर्भात निश्चित आकडेवारी निश्चित करणे अथवा प्रक्रिया राबविणेकरिता येणा-या अडचणी, करावयाचे बदल अथवा काही अडचणी निर्माण झाल्यास याबाबत संपुर्ण अधिकार पिंपरी महानगरपालिका स्तरावर – पिंपरी महानगरपालिकेतील सहाय्यक आयुक्त, माहिती व जनसंपर्क विभाग यांचेकडे राहतील.

१० प्रसिध्दी माध्यमांकरिता पासेसची रक्कम लेखा विभागामार्फत खर्ची टाकणेत येईल.

सदर प्रमाणे प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींसाठी मोफत बस पास योजनेच्या अटी व शर्तीसह धोरण ठरविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी प्रसार माध्यम प्रतिनिधींना प्रचलित अटी-शर्ती कायम ठेवून मोफत बसपास देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.निर्मला कुटे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.उषा ढोरे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- प्रसार माध्यम प्रतिनिधींना वार्षिक बस पास रकमेच्या १०% रक्कम अधिक मी कार्डचे र.रु. ८०/- मनपा कोषागारात जमा केल्यावर बस पास प्रक्रिया पुर्ण करणेबाबतचा ठराव आहे. त्याऐवजी सदर ठरावातील अ.क्र. ३ ते १० प्रमाणे नियम व अटी कायम ठेवुन सर्व प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना वार्षिक बस पास मोफत देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.जयश्री गावडे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर या विषयाच्या संदर्भामध्ये पत्रकारानी विनंती केली होती. गेल्या अनेक दिवसापासूनची ही परिस्थिती होती की, पत्रकारांना बसपासच्या संदर्भात सवलत मिळाली पाहीजे. मागच्या जीबीमध्ये हा विषय विधी समितीच्या माध्यमातून घेतलेला होता पण टेक्निकली हा विषय नाही घेता आला. त्याच्यामध्ये अभ्यास करुन ठरवल की पुण्यामध्ये काय सवलती दिल्या जात आहेत. पुण्यामध्ये पत्रकारांकडून काही पैसे घेतले जात होते. परंतु पिंपरी चिंचवडमधले जे पत्रकार

आहेत, पुणे आणि पिंपरी मधला निश्चितच फरक आहे. पत्रकारांना असं कधीही आम्ही सत्तेच्यामध्ये आल्यानंतर त्यांच्या बाबतीत आम्ही कुठतरी दुजाभाव करतोय ही भावना झाली नाही पाहीजे. मला वाटत की पत्रकारांच्या या विनंतीला मान देवुन मोफत बसपास देण्याच्या संदर्भामध्ये या महापालिकेमध्ये हा ठराव आम्ही केला. मला असं वाटत की पत्रकारांच्या या पुढच्या काळामध्ये भारतीय जनता पार्टीतले आम्ही सर्वजण पत्रकारांच्या अडीअडचणी असतील त्यांच्या समस्या असतील निश्चितच आम्ही पत्रकारांच्या बाजूने पुढच्या काळामध्ये काम करु. तुमच्या समस्या निश्चितच याही संदर्भामध्ये घराच्या संदर्भात सुध्दा पत्रकारांचे विषय आहेत याही संदर्भामध्ये आपण सर्वजण हे सभागृह निश्चितच आपल्या बरोबर पुढच्या काळामध्ये असेल. मी सर्वांना विनंती करतो की मा.महापौर साहेब, या पत्रकारांच्या दृष्टिने हा जो महत्वाचा मुद्दा होता, गेल्या अनेक दिवसापासून त्यांची जी अडचण होती, मला असं वाटत की हा विषय सभागृहाने एकमताने मंजूर करावा अशी मी विनंती करतो.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय अतीशयच चांगला आहे की पत्रकारांना आपण याठिकाणी मोफत बसपासेस देतो. हे देत असताना सभागृहाच्या एक गोष्ट निदर्शनास आणुन देऊ इच्छितो की सहा महीने ऑलरेडी हे पासेस लेट झालेले आहेत. झालेल्या सहा महीन्याचे तुम्ही पैसे भरुन घेता वीस टक्के, दहा टक्के तुम्ही कसं बायफरगेट करणार आहेत याची गॅरंटी या ठरावामध्ये असावी. याठिकाणी मी मा.महापौरांच अभिनंदन करतो की अशाप्रकारे त्यांनी सहानुभूतीपुर्वक याठिकाणी पत्रकारांचा विचार केला आहे. भविष्यात त्यांच्या गरजा सोडवण्याचे भाष्य सुध्दा भारतीय जनता पार्टीच्या पक्षनेत्यांनी याठिकाणी केलेली आहे. सभागृहात असताना याठिकाणी कुठल्याही पक्षाचा काही संबंध नसताना सभागृह आणि या शहरातील सर्व नगरसदस्यांची देखील याला संमती आहे कोणाचाही या विषयाला विरोध नाही. आपण हा विषय जरुर करावा पण तो करत असताना झालेले सहा महीने त्याचा झालेला डिले त्या डिले मध्ये त्यांची रक्कम भरुन घेताना त्याची एक व्हॅलीडीटी या ठरावात असावी. तरी हा ठराव करत असताना त्यांचा जो दहा टक्के पंचवीस टक्के हा जो शेर आहे त्याच्यात त्या झालेल्या सहा महीने कालावधीचा विचार करावा ही विनंती.

**मा.महापौर-** हा विषय उपसूचनेसह मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ५० विषय क्रमांक – २

दिनांक – २०/७/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.माजसं/२/कावि/३४२/२०१७, दि.३१/०५/२०१७
२) मा. विधी समिती सभा ठराव क्र.१२ दि.१६/६/२०१७

प्रसार माध्यम प्रतिनिधींना वितरीत करावयाच्या मोफत बस प्रवास पासेसबाबत आकारावयाच्या रक्कमेबाबत (राज्यशासनाकडून प्राप्त झालेले अधिस्विकृती ओळखपत्रधारक पत्रकरांना वार्षिक रकमेच्या १०% रक्कम स्विकारून व अधिस्विकृती ओळखपत्र नसलेल्या प्रसार माध्यम पत्रकारांकरिता वार्षिक रक्कमेच्या २५% रक्कम स्विकारून सवलत देणेबाबत)

**नियम व अटी:-**

१. राज्य शासनाकडून वितरीत केल्या जाणा-या अधिस्विकृती ओळखपत्रधारक असल्यास सदर प्रसारमाध्यम प्रतिनिधींना वार्षिक बसपास रकमेच्या १०% रक्कम अधिक मी-कार्डचे र.रु.८०/- मनपा कोषागारात जमा केल्यावर जमा रकमेची पावती सादर केल्यानंतर पास प्रक्रिया पूर्ण करावी.
२. अधिस्विकृती ओळखपत्र नसल्यास पास रकमेच्या एकूण वार्षिक रकमेपैकी २५% अधिक मी-कार्डचे र.रु.८०/- रक्कम मनपा कोषागारात जमा केल्यावर जमा रकमेची पावती सादर केल्यानंतर पास प्रक्रिया पूर्ण करावी.
३. दैनिक/साप्ताहिकांचे अंक नियमित मनपाकडील महत्वाच्या विभागांमध्ये वितरीत होणे आवश्यक राहील. दैनिक/साप्ताहिक/इलेक्ट्रोनिक प्रसारमाध्यमांमधील प्रतिनिधी यांची मनपाच्या विविध पत्रकार परिषदा,कार्यक्रमांना उपस्थिती व आवश्यक प्रसिद्धी होणे आवश्यक राहील. तसेच प्रसिद्धी करण्यात आलेल्या वृत्तांचे वृत्तपत्रे मनपाकडील महत्वाच्या विभागांमध्ये नियमित वितरीत करणे आवश्यक राहील.
४. दैनिक/साप्ताहिक/इलेक्ट्रोनिक प्रसारमाध्यमांकडील फक्त एका प्रतिनिधीस पास देण्यात येईल.
५. ज्या पत्रकारास पास द्यावयाचा आहे अशा पत्रकाराची पिंपरी चिंचवड महानगरपालिका वार्तांकनाकरीता नियुक्ती करण्यात आले असल्याचे मा.संपादक यांचे पत्र.
६. इलेक्ट्रॉनिक वाहिन्या संदर्भात संबंधित इलेक्ट्रॉनिक वाहिनीचे प्रसारण किमान स्थानिक पातळीवर होणे आवश्यक आहे. तसेच संबंधित प्रतिनिधींनी पिंपरी मनपाकडील वार्तांकन करणे/प्रत्यक्ष संपर्क साधणे आवश्यक आहे.
७. वरीलप्रमाणे दैनिक/साप्ताहिके/इलेक्ट्रॉनिक वाहिन्यांचे प्रतिनिधींनी मागील किमान सहा महिन्याचे कालावधीत मनपा मुख्य कार्यालय/अन्य कार्यालये कडील वार्तांकन/छायाचित्रण केलेले असणे आवश्यक आहे.
८. पिंपरी मनपा मुख्य भवनात येणारे प्रसिध्दी माध्यमांचे प्रतिनिधी, पिंपरी मनपा वार्तांकन, छायाचित्रण करणारे प्रतिनिधींचे बाबतीत पिंपरी मनपातील माहिती व जनसंपर्क विभागाने वरीलप्रमाणे निकषास अनुसरुण पास देणेबाबत प्रक्रिया करावी.
९. वरीलप्रमाणे निकषात बदल करणे, नवीन निकष समाविष्ट करणे, रद्द करणे, पासा संदर्भात निश्चित आकडेवारी निश्चित करणे अथवा प्रक्रिया राबविणेकरिता येणा-या अडचणी, करावयाचे बदल अथवा काही अडचणी निर्माण झाल्यास याबाबत संपुर्ण

अधिकार पिंपरी महानगरपालिका स्तरावर–पिंपरी महानगरपालिकेतील सहाय्यक आयुक्त, माहिती व जनसंपर्क विभाग यांचेकडे राहतील.

१० प्रसिध्दी माध्यमांकरिता पासेसची रक्कम लेखा विभागामार्फत खर्ची टाकणेत येईल.

सदर प्रमाणे प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींसाठी मोफत बस पास योजनेच्या अटी व शर्तीसह धोरण ठरविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी प्रसार माध्यम प्रतिनिधींना प्रचलित अटी-शर्ती कायम ठेवून मोफत बसपास देणेस तसेच प्रसार माध्यम प्रतिनिधींना वार्षिक बस पास रकमेच्या १०% रक्कम अधिक मी कार्डचे र.रु. ८०/- मनपा कोषागारात जमा केल्यावर बस पास प्रक्रिया पुर्ण करणे ऐवजी सदर ठरावातील अ.क्र. ३ ते १० प्रमाणे नियम व अटी कायम ठेवुन सर्व प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना वार्षिक बस पास मोफत देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.आरती चोंधे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ३

दिनांक – २०/७/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.प्रशा/२/कावि/३१७/२०१७, दि.३०/०६/२०१७
२) मा.विधी समिती ठराव क्र. १५ दि.७/७/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये ग्रामपंचायत सेवेमधून वर्ग झालेल्या कर्मचा-यांपैकी १० वर्ष सेवा पूर्ण न झालेल्या तथापि दहा वर्ष सेवा पूर्ण होण्यासाठी एक वर्षापर्यंत कमी सेवा कालावधी असलेल्या कर्मचा-यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव व पदनाम | मनपाकडील नियुक्ती दिनांक | | मनपामधील एकूण सेवा |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. भालेकर सदाशिव घमाजी, शिपाई | ०३/१२/१९९७ | | ९ वर्षे २९ दिवस |
| २. | श्री.बिडकर तुकाराम बन्सी, शिपाई | ०३/१२/१९९७ | | ९ वर्षे २ महिने २९ दिवस |

श्री.भालेकर सदाशिव घमाजी यांनी त्यांचे दि. -/०७/२०१५ चे पत्रात (दि.१९/१०/२०१५

रोजी आवक) नमूद केलेल्या बाबी व त्या अनुषंगाने केलेले मागणीचे अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील १० वर्षे सेवा पुर्ण होणेचे दृष्टीने मा.शासनामार्फत श्री.भालेकर सदाशिव घमाजी व श्री.बिडकर तुकाराम बन्सी यांच्या सेवेत भर घालण्यास मान्यता दिल्यास सदर कर्मचा-यांना निवृत्ती वेतन व इतर आर्थिक फायदे अदा करणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आर्थिक भार उचलणेस तयार असलेबाबत व प्रकरणी शासनाचे अभिप्राय / मार्गदर्शन मिळणेकामी इकडील पत्र क्र.प्रशा/०२/कावि/१७६/२०१६ दि.०२/०५/२०१६ अन्वये शासनास पत्र दिले आहे. त्यावर शासनाने पत्र क्र.पीसीसी-३०१६/प्र.क्र.३४८/नवि-२२ दि.२५ ऑक्टोबर,२०१६ अन्वये कळविले आहे **की "मा.शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व नियम तपासून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने प्रस्तुत प्रकरणी महानगरपालिकेच्या स्तरावर उचित निर्णय घ्यावा, तथापि कोणताही निर्णय घेतल्यामुळे समस्या उद्भवणार नाही याची दक्षता घ्यावी "**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन)नियम १९८२ मधील प्रकरण ५ (अर्हताकारी सेवा) मधील ५४(२) मध्ये खालीप्रमाणे तरतूद आहे. **" सेवानिवृत्त होणा-या शासकीय कर्मचा-याने निवृत्तीवेतनासाठी केलेल्या अर्हताकारी सेवेच्या कालावधीमध्ये, शासन सामान्यत:एक वर्षाहून अधिक नसेल इतक्या मुदतीची भर घालू शकेल आणि ही मुदत या नियमाच्या तरतूदीनुसार निवृत्तीवेतनासाठी हिशेबात घेता येईल."**

प्रस्तुत प्रकरणी शासनाने यापूर्वी मनपास दि.२५/१०/२०१६ चे पत्रान्वये वरीलप्रमाणे मार्गदर्शन केले आहे. त्यामध्ये शासनाने प्रस्तुत प्रकरणी महापालिकेनेच त्यांचे स्तरावर उचित निर्णय घेणेबाबत कळविले आहे. त्यामुळे श्री. भालेकर सदाशिव घमाजी, शिपाई (सेवानिवृत्त) व श्री.बिडकर तुकाराम बन्सी, शिपाई (सेवानिवृत्त) यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील १० वर्ष सेवा पूर्ण होणेचे दृष्टीने व निवृत्तीवेतनाकरीता किमान सेवा कालावधी पूर्णहोणेच्या दृष्टीने या दोन्ही कर्मचा-यांना निवृत्तीवेतन अदा करणेसाठीचा आर्थिक भार उचलण्यास महानगरपालिका तयार असल्यास या दोन कर्मचा-यांच्या सेवेत एक वर्षापर्यंत भर घालणे अथवा शिथिल करणेस व तदनंतर निवृत्तीवेतन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.निर्मला कुटे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.विकास डोळस -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पीएमपीएमएल मध्ये अतिरीक्त असलेले कर्मचारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वर्ग केलेले होते. सदरचे कर्मचारी पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये वर्षानुवर्षे काम करत होते परंतु या कर्मचा-यांना पुन्हा पीएमपीएमएल मध्ये बोलावून घेतले आहे. तथापि सद्या महापालिकेमध्ये कर्मचा-यांची कमतरता भासत आहे. तरी या पीएमपीएमएल कर्मचा-यांच्या सेवा पुनश्च: महानगरपालिकेमध्ये वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.लक्ष्मण उंडे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.स्विनल म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. श्री.भालेकर सदाशिव घमाजी व श्री.बीडकर तुकाराम बन्सी हे तळवडे येथे आमच्याकडे ग्रामपंचायत काळामध्ये काम करणारे कर्मचारी होते. महापालिकेमध्ये १९९७ मध्ये नवीन गावे समाविष्ट झाल्यानंतर ग्रामपंचायतीमधील सर्व कर्मचा-यांना महापालिका सेवेमध्ये विलीनीकरण करुन घेतले आहे. ग्रामपंचायत काळामध्ये अतीशय प्रतीकूल परिस्थितीमध्ये श्री.भालेकर व श्री. बीडकर यांनी तळवडे आणि चिखली गावामध्ये अतीशय चांगल्याप्रकारची सेवा दिलेली आहे. महापालिकेमध्ये विलीनीकरण झाल्यानंतर महापालिकेमधील सेवेचा कार्यकाल हा नियमाप्रमाणे दहा वर्षे पुर्ण होत नसल्यामुळे तसेच दोन्ही कर्मचा-यांना आजपर्यंत अनेक आर्थिक लाभ तसेच निवृत्तीवेतनापासून वंचित राहावे लागलेले आहे. दोन्ही कर्मचा-यांच्या घरची आर्थिक परिस्थिती अतीशय हालाकीची असल्यामुळे तसेच वयोमानानुसार आजारपणामुळे त्यांना आर्थिक मदत मिळणे गरजेचे आहे म्हणून या नियमानुसार सदर कर्मचा-यांना दहा वर्षे सेवेमधील कालावधी गणनामुळे निवृत्ती वेतन व इतर आर्थिक फायदे निश्चित मिळतील त्यामुळे हा विषय मंजूर करावा अशी मी विनंती करते, धन्यवाद.

**मा.पंकज भालेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. विषय क्रमांक ३ हा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये जे कर्मचारी त्यावेळेस ग्रामपंचायत काळातून वर्ग झालेले होते असे दोन कर्मचारी श्री.भालेकर सदाशिव घमाजी व श्री.बीडकर तुकाराम बन्सी यांची दहा वर्षे सेवा पुर्ण झालेली नाही. सेवा पुर्ण करण्यासाठी त्यांना काही महीन्याची गरज होती. श्री.भालेकर सदाशिव घमाजी व श्री.बीडकर तुकाराम बन्सी हे गेली दहा वर्षे महापालिकेकडे पाठपुरावा करतात. आज त्यांचे वय ७० झालेले आहे त्यांच्या कुटूंबाची आर्थिक परिस्थिती खुप बेताची आहे. ते गेली दहा वर्षे महापालिकेकडे पाठपुरावा करतात. आज सुदैवाने हा विषय सभागृहासमोर आलेला आहे. निश्चितच आपले जे कर्मचारी आहेत त्यांचे महापालिकेत योगदान असते. त्यांना आर्थिक लाभ देण्याची गरज आहे हा विषय मंजूर करावा अशी मी विनंती करतो, धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आताच आपण दोन कर्मचा-यांच्या संदर्भामध्ये याठिकाणी मुद्दा उपस्थित केला आहे. पीएमपीएमएलचे जे ७२ कर्मचारी आहेत. या पिंपरी चिंचवड शहरामध्ये पीसीएमटी असल्यापासून हे कर्मचारी काम करतात. आता पीएमपीएमएलची स्थापना झाल्यापासून आजतागायत पर्यंत पिंपरी चिंचवड शहरामध्ये विवीध आगारामध्ये काम करत होते. परंतु मागच्या काळामध्ये सभागृहामध्ये ती लोक आपल्या सगळयांना भेटली आहेत. त्यांच जे काम आहे जे स्किल आहे त्या स्किलच्या माध्यमातून या पीएमपीएलला आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये राहून सुध्दा चांगल्या पध्दतीच काम याठिकाणी ते करु शकतात आणि त्यांना वीस ते पंचवीस वर्षे झालेले आहेत आणि आता ते रिटायरमेंटच्या काळामध्ये त्यांना जाणुन बुजून कुठतरी लांब हाडपसर किंवा

वेगवेगळया डेपामध्ये पाठविण्यात येतं. मला वाटत की त्यांच्यावर हा अन्याय होतो आहे. अशा पध्दतीने चांगली सेवा करणा-या कर्मचा-यांना जे ७२ कर्मचारी आहेत त्यांना आपल्याकडे घ्याव अशी मी विनंती करतो आणि हा विषय उपसूचनेसह मंजूर करावा अशी विनंती करतो.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा अतीशय चांगला विषय सभागृहासमोर आलेला आहे. गेल्या काही वर्षापासून त्या कर्मचा-यांची परिस्थिती अतीशय हालाकीची आहे असं आताच सांगीतल. आपण निश्चितच हा विषय मंजूर करावा परंतु हे करत असताना मला काही गोष्टीकड आपलं लक्ष वेधायच आहे. आपल्या शहरातच बरेचसे असे उपअभियंता आहेत की ते २५ ते ३० वर्षापासून याठिकाणी काम करतात. ते काम करत असताना त्यांच्यामध्ये आपण डिप्लोमा/डिग्री अशाप्रकारचे भेद करतो. प्रमोशन देताना ब-याच वेळा सांगीतल असेल की तीस ते चाळीस वर्षे सर्व्हिस झाल्यानंतर सुध्दा त्यांचे ज्युनिअर त्यांच्या पुढे जातो, त्याठिकाणी आपल्याला कोणावरही अन्याय करायचा नाही. ना डिप्लोमा होल्डरवर ना डिग्री होल्डरवर. परंतु शासनाने वेळोवेळी केलेले नियम, वेळोवेळी केलेले आदेश तपासून पिंपरी चिंचवड महापालिकेनी प्रस्तूत प्रकरणी महापालिकेच्या स्तरावर उचित निर्णय घ्यावा तथापि कोणताही निर्णय घेतल्यामुळे समस्या उद्भवणार नाही याची दक्षता घ्यावी. अशाप्रकारचे आदेश देखील शासनाचे आहेत. परंतु आपण नेहमीच त्या आदेशाला स्थगिती आहे आम्ही असे करु शकत नाहीत, डोईफोडे साहेब सांगतात आम्ही आयुक्तांना सांगू, आयुक्त निर्णय घेतील. असे कर्मचारी आपल्या महापालिकेमध्ये वर्षानुवर्षे काम करतात. यांच्या समस्याकडे सुध्दा आपण लक्ष दयावे. डोईफोडे साहेबांना मी काही प्रश्न सभागृहाच्या माध्यमातून विचारतो. पिंपरी चिंचवड महापालिका स्थापत्य विभागातील उपअभियंतांचे दि.१/५/२०१६ च्या आदेशाला राज्यशासनाने दि.१६/५/२०१७ रोजी स्थगिती आदेश दिला आहे का व त्या शासनाच्या आदेशानुसार स्थगितीची कार्यवाही करण्यात आलेली आहे का. नसल्यास का कारवाई करण्यात आलेली नाही. तसेच शासनाने कळविल्याप्रमाणे स्थापत्य विभागातील अभियंत्यांची फेर निवड सुची तयार करण्यात आली आहे का. शासनाने दिलेले आदेश विचारात घेता यापुर्वी बेकायदेशिर व चुकीची पदोन्नती करण्यात आलेली आहे का आल्यास त्याला जबाबदार कोण. चुकीच्या पदोन्नतीमुळे २५ ते ३३ वर्षे सेवाजेष्ठ अभियंत्यांवर अन्याय झालेला आहे. या अन्यायाला जबाबदार कर्मचा-यावर प्रशासन कारवाई करणार का. असे असंख्य प्रश्न याठिकाणी कर्मचा-यांचे पेंडींग असताना आज आपण उच्च शिक्षीत अभियंता म्हणतो त्यांची देखील आज गेली काही वर्षापासून हेडसांड याठिकाणी होत आहे. त्याकड आपण देखील लक्ष दयाव. आयुक्त साहेब या प्रश्नांचे उत्तर अपेक्षीत आहे. श्री.बीडकर व श्री.भालेकर यांना निश्चितच मुदतवाढ दयावी त्यामुळे त्यांच्या भविष्यातील पेन्शनवर, कुठल्याही गोष्टीवर परिणाम होणार नाही. याच्या मागचा हेतू निश्चितच चांगला आहे. हे करत असताना आपण बाकीच्या अभियंताचा आणि कर्मचा-यांचा देखील सहानुभूतीने विचार करावा.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. उपसूचना आता दिलेली आहे. पीएमपीएमएलचे ७२ कर्मचारी वर्ग केलेले आहेत. आज त्या विषयावर त्यांना परत आपल्याकडे घ्यावे यास आमचा सर्वांचा पाठींबा आहे. आयुक्त साहेब मी एकदा पत्र दिलेले होते त्यातल्या सगळया गोष्टी तुम्हांला दाखवल्या आहेत. की पीएमपीएमएलवर पिंपरी चिंचवडच्या कर्मचा-यांवर किती अन्याय केला जातो. साहेब मला वाटत तुम्ही शहनिशा केली असेल. आजही कर्मचा-यांची परिस्थिती अशी आहे की त्यांना घर हा प्रकारच माहीत नाही. कर्मचा-यांचे म्हणणे असे आहे त्यातून तुमच्या उत्पन्नात चांगली भर पडली पाहीजे परंतु तसे काहीही न होता आज पीएमपीएमएल परत जैसे थे. म्हणजे खरतर काही काही दिवसामध्ये आपल्याला उत्पन्न जास्त मिळतं. परंतु आता सद्य परिस्थितीमध्ये तसं काहीही होत नाही. आहे तशीच परिस्थिती आहे. कर्मचा-यांनी अक्षरशा: सकाळी उठून जायचे. म्हणजे जर निगडीचा माणुस असेलतर त्यांनी हाडपसरला थम्ब करायला जायचे आणि वडगावचा जरी माणुस असू दे किंवा च-होलीचा माणुस असु देत त्यांनी स्वारगेटला थम्ब करायला जायचं. हा कुठतरी बदल झाला पाहीजे. आपल्या डेपोमध्येच त्यांना थम्ब करु दयावे. त्यांची जर फर्स्ट शिफ्ट असेलतर पाहाटे तीन वाजता त्यांना घर सोडाव लागतं. त्यांना जाण्यायेण्यासाठी दोन-दोन तास लागतात तर त्या कर्मचा-यांनी करायच तरी काय. जर त्यांना पटत नसेलच तर आपल्या लोकांना व्हीएसआर लागू करा. अक्षरश: आपले लोक व्हीएसआर घ्यायच्या सुध्दा मनस्थितीत आहेत.  कर्मचा-यांना त्यांच्या अंतकरणातून त्यांना काम करायच आहे परंतु अशी परिस्थिती असेलतर त्याच्यावर काहीतरी मार्ग काढला पाहीजे. दरवेळेस पुण्यातील लोक त्यांना त्रास देणार आणि आपल्या कर्मचा-यांनी ऐकूण घ्यायच आणि आपण दरवेळेला सहन करायचं. आम्हांला तुकाराम मुंढे यांच्या विरोधात अजीबात बोलायचे नाही. चांगले अधिकारी, चांगले प्रशासक असलेच पाहीजेत पण याचा अर्थ असा होत नाही की निगडीतला माणसानी हाडपसरला सही करण्यासाठी जायच आणि च-होलीतल्या माणसाने स्वारगेटला सही करण्यासाठी जायच हे कुठल्या तत्वात बसतं. एखादया कर्मचा-याच्या घरामध्ये सुखदुख असेलतर आपण त्याच्या सुखदुखामध्ये सहभाग घेतो. परंतु या कर्मचा-यांच्या बाबतीतली वागणूक इतक्या वाईट पध्दतीची आहे की त्यातून तुमचा काही प्रशासनाचा फायदा झाला का, पीएमपीएमएलचा काही फायदा झाला का. हे कुठेतरी बघितले गेले पाहीजे. त्या लोकांना तुम्ही अशा डयुटया लावून त्यांने जर तुमचा भरणा वाढत असेलतर, ते अंतकरणपासून जीव ओतून जर काम करत असतीलतर त्या गोष्टीचा फायदा आहे. नाहीतर महापौर साहेब, याच्यावर कुठतरी आवाज उठवला गेला पाहीजे. तेथे जाऊन त्यांना बस पण मिळत नाहीत. ४०-४०, ५०-५०, ८०-८० बस उभ्या असतात. फोटो काढून दाखवले, आपल्याकडे व्हॉटसअप आहे ते पाठवतो. आपल्या बसेस आहेत आणि दाखवताना ठेकदाराच्या बसेस दाखवतात. लोकांचा वाहतूक व्यवस्थेवर विश्वास राहीलेला नाही. बस कधी येणार, ती फेल होणार का, येणार का

नागरीकांपर्यंत ती पोहचणार का अशी सुध्दा परिस्थिती राहीली नाही आणि म्हणून ट्रॅफिकचे सुध्दा इतके तीन तेरा, नऊबारा झालेले आहेत. एकतर मेट्रो अजून पाच वर्षानी होणार आहे आपल काम सुरु झालेले आहे. आम्ही मागच्यावेळेस सुध्दा म्हणलेल होत की पुण्यातन मेट्रो पहीली सुरु करा आमचा मेट्रोला विरोध नाही, विकासाला विरोध नाही परंतु आज आपण अर्धे रस्ते सगळे बंद करुन ठेवले आहेत. पावसाळयाचे दिवस चालू आहेत. विदयार्थ्यांना बस मिळत नाही. मध्यंतरी मी एक पत्र दिलेले आहे. त्यांनी कळवल की एक बस पंधरा मिनीट किंवा अर्धा तास आदि चालू करु. परंतु विदयार्थ्यांच्या सोईनुसार बसेस नाही. तुमचा भरणा होणार कसा. पीएमपीएमएल तोटयातून बाहेर येणार कशी. हे दोन कर्मचारी आहेत त्याबाबत आम्ही कोणत्याच विरोधात नाहीत. त्यांनाही न्याय मिळाला पाहीजे. पीएमपीएमएलच्या लोकांना सुध्दा न्याय मिळाला पाहीजे परंतु उर्वरीत जे कर्मचारी आहेत त्यांना सुध्दा न्याय मिळाला पाहीजे. साहेब यात तुम्ही लक्ष घालणार का याचा खुलासा करावा अशी विनंती आहे. कारण लोक कंटाळली आहेत मुलांचे दप्तर घेण्यासाठी लोकांना वेळ नाही एवढे लोक कंटाळलेले आहेत. म्हणजे त्या पीएमपीएमएलच्या कर्मचा-यांने त्याच्या मुलांकडे लक्ष कुठल दयायच, एकतर शाळा सुरु झालेल्या आहेत त्या कर्मचा-यांना किती त्रास दयायचा हे तरी ठरवल पाहीजे. तो माणुसच नाही का, त्याला फॅमिली, कुटूंब नाही का. याच्यावर खुलासा करावा. आपल्याकडील पीएमपीएमएलच्या ड्रायव्हरनां वाट्टेल तशा डयूटया दिलेल्या आहेत. हे आम्ही सिध्द करुन दाखवल आहे. आम्ही पेपरला मुद्दाम दिलेले नाही. मलातर काहीच इन्ट्रेस्ट नाही पेपरला बातमी आलीच पाहीजे आणि काहीतरी तो खुलासा झालाच पाहीजे. मोठी हेडलाईन आली पाहीजे. कर्मचा-यांचे प्रश्न सुटले पाहीजे. आम्ही मुंढे साहेबांच्या विरोधात बोललो नाहीत. असं व्हायला नको की आम्ही त्यांच्या विरोधात बोलतोत याचा अर्थ आम्ही मुंढे साहेबांच्या विरोधात आहोत, अजीबात नाही. मुंढे साहेबांचा जो स्वभाव आहे त्याच्यामध्ये पीएमपीएमएल चांगली सुधारली पाहीजे. परंतु पीएमपीएमएल सुधारण्यापेक्षा आमच्या कर्मचा-यांची पिळवणूक चाललेली आहे याला काय म्हणायच. दरवेळेला कुठलतरी एखादयाच नाव दयायच आणि त्या प्रमाणे तुम्ही शासन करताय असं म्हणायचं. आपल्या कर्मचा-यांचे तुम्ही पालक आहात त्यामुळे तुम्ही लक्ष घालून आम्हांला याठिकाणी खुलासा करावा. सगळया लोकांना कळलं पाहीजे की आपल्या पीएमपीएमएलच्या ड्रायव्हर, कर्मचा-यांना किती त्रास होतो आयुक्त साहेब खुलासा करावा.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, खरतर दोन कर्मचा-यांचा हा विषय आहे. दोन कर्मचारी शिपाई म्हणून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या भविष्याच्या दृष्टिने, त्यांच्या उदरनिर्वाहाच्या दृष्टिने हा विषय याठिकाणी मांडलेला आहे. परंतु या सभागृहात चर्चा करत असताना सन्मा. गटनेते राहूल कलाटे, मंगलाताई यांनी दोन तीन मुद्दे उपस्थित केलेले आहेत. याठिकाणी महापालिकेत आमची सत्ता आल्याच्यानंतर कुठल्याही कर्मचा-यांवर भेदभाव केला जाणार नाही हे पहील्याच दिवशी आम्ही अभीवचन दिलं आहे.

पारदर्शी कारभार करत असताना, म्हणत असताना एखादयावर अन्याय करायचा आणि दुस-यावर कुठतरी चुकीच्या पध्दतीने न्याय देण्याचा अशा पध्दतीचा कुठलाही विषय पुढच्या काळामध्ये करणार नाहीत किंवा मागच्याही काळामध्ये आम्ही केला नाही. ताई खरं आहे पीएमपीएमएलच्या कर्मचा-यां बद्दल तुम्ही खुप पोटतीडकीने हा विषय मांडत होता. मुंढे साहेबां सारखा एक चांगला अधिकारी याठिकाणी महापालिकेच्या माध्यमातून, पीएमपीएमएलच्या माध्यमातून आपण आणला. एवढयासाठी आणला की लोकांना पुण्यामध्ये जाण्यासाठी जो त्रास होता तो त्रास हा कमी झाला पाहीजे. मला असं वाटतय की मुंढेच्या प्रयत्नामुळे निश्चितच कर्मचा-यांच्या बद्दलच्या समस्या आहेत ते सोडविण्यासाठी मी मा.आयुक्त साहेबांना विनंती करतो की मुंढे साहेबां बरोबर चर्चा करुन आपल्या कर्मचा-यांना त्रास होणार नाही अशा पध्दतीची निश्चितच काळजी घेण्याची गरज आहे. पण ताई तुम्ही बोलता बोलता दोन गोष्टी म्हणल्या की मेट्रोचे काम चालू आहे आणि आता रहदारीची समस्या निर्माण झाली आहे. मला अस वाटतय की आम्ही शब्द, अश्वासन देतो, घोषणा करतो आणि काहीच करत नाहीत अशी परिस्थिती आमच्या काळामध्ये होणार नाही. मागच्या वर्षाच्या काळामध्ये आम्ही महापालिकेमध्ये सत्तेमध्ये येण्याच्या अगोदर मा.पंतप्रधान यांच्या हास्ते पुण्यामध्ये मेट्रोचे उदघाटन झाल आणि पिंपरी चिंचवडवासियांना एक आशा लागली होती की खरचं पिंपरी चिंचवडवरुन मेट्रो धावणार की नाही. मा.पंतप्रधानांनी घोषणा केली आणि माल माहितय की पाच वर्षा मध्ये मेट्रो धावली पाहीजे. तुम्ही विकासाच्या विरोधात नाहीत, विकास झाला पाहीजे अशी तुमची खुप चांगली भावना आहे. परंतु हा जो त्रास पुढच्या पन्नास-शंभर वर्षात ट्रॅफिकची व्यवस्था चांगल्या पध्दतीने करायची असेलतर मेट्रोची सुरवात, मेट्रोच काम ज्या गतीन चालू आहे, मला खात्री आहे पाच वर्षाच्या आत मेट्रोचा प्रकल्प निश्चितच पुर्ण होणार आहे. पुढच्या काळामध्ये पीएमपीएमएलची जी परिस्थिती आहे, मला माहिती आहे की पीएमपीएमएलच्या कॉन्ट्रॅक्टच्या बसेसच्या दृष्टिन काय होत होत, मला मागच्या काळामध्ये जायचे नाही. बसेस कोणाच्या होत्या त्या बसेसमध्ये काय गौडबंगाल होतं या संदर्भातही जायच नाही. पण पुढच्या काळामध्ये पिंपरी चिंचवड शहरातून जाणा-या नागरीकांना एसी बसेस सुध्दा उपलब्ध करुन देण्याचे काम विशेषत: महीलानाही स्वतंत्र बसेस उपलब्ध करुन देण्याच काम आम्ही निश्चितच करतो. आपण चांगली चर्चा केली आहे मा.महापौरांना मी विनंती करतो की हा विषय उपसूचनेसह मंजूर करावा, धन्यवाद.

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर-** शहराचे जे काही प्रश्न असतील ते विषय संपल्यानंतर घेऊ.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपले आभार मानतो की आपण बोलण्यासाठी परवानगी दिली आहे, महापौर साहेब आपण आपला अधिकार वापरल्याबद्दल अभिनंदन.

**मा.महापौर-** मी कायमच माझा अधिकार वापरतो. आपल्या पार्टीसारख कोणाच बंधन नाही आमच्यावर, आम्ही सुध्दा पार्टीमध्ये काम केलेलं आहे, आम्हांला माहीती आहे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एकनाथ पवार यांचे मनापासून अभिनंदन करतो. त्यांनी सांगीतल की आम्ही लोकशाही जतन करतो. लोकशाहीच्या पध्दतीने आम्ही जे काही शब्द दिलेले आहेत ते पाळतो आणि आम्ही पाळणार आहोत. मेट्रो बद्दलचा मंगलाताईनी जो विषय सांगीतला त्याचा खुलासा केला, बाकीचा पण त्यांनी खुलासा केलेला आहे. मधुन मधुन पत्रकार परिषदही ते घेत असतात. त्यांच्या मनाला येईल ते बोलत असतात. आम्ही हात वर केला तेव्हा तुम्ही बोलू देत नाहीत. माझ म्हणण हेच आहे की ख-या अर्थाने लोकशाही जतन करण्याचच काम कराव. जे मोदीजीने शिकवले त्याच पध्दतीने करा. काही लोकांच्या मनमर्जीन सभागृह चालू नका. दुसरी गोष्ट अशी आहे की जो काळ जेंव्हा तुम्ही इथ होता तो काळ तुम्ही विसरलेला दिसतात.

**मा.महापौर-** तुम्ही विषयावर बोलावे, विषय सोडून बोलू नका.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पंधरा दिवसापुर्वी सन्मा. नेत्यांनी भाष्य केलेल असेल की राष्ट्रवादीच्या काळामध्ये राष्ट्रवादीनी अनेक उपसूचना देवून कोटयावधी रुपये लाटले आणि आपली घर भरली. येथे विषय क्रमांक १ ला उपसूचना, विषय क्रमांक २ ला उपसूचना, विषय क्रमाक ३ ला उपसूचना एवढेच नव्हेतर मागच्यावेळेस विषयपत्रीकेवर नऊ विषय होते आणि पाच विषयावर उपसूचना दिल्या आणि अख्ख्या बजेटला ब्लँकेट आपण मंजूरी दिली ती सुध्दा सभावृत्तांच्या विषयाला.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर -** तुम्ही विषय सोडून बोलू नका, विषयाला धरुन बोलावे. या विषयाला आम्ही उपसूचना देऊ शकतो त्या मंजूर करु शकतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. नगरसचिवांनी सुध्दा कायदयाचा भंग करु नये. मागच्यावेळेस सभावृत्तांत कायम करायचा होता त्या विषय क्रमांक ७ ला चुकीच्या पध्दतीने ब्लँकेट मंजूरी दिली आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** सर्वांनी शांत रहावे, विषय सोडून बोलू नका. विषय क्रमांक ३ हा उपसूचनेसह मंजूर करणेत येत आहे. पुढील विषय घ्यावा आम्ही तुम्हांला बोलण्यासाठी संधी देतो परंतु तुम्ही वेगळया विषयावर चर्चा करता तुम्ही विषयावर चर्चा करा. विषय धरुन बोला. तुमचे जे प्रश्न असतील ते प्रश्नोत्तराव्दारे आम्हांला कळवा ते निश्चित आम्ही घेवु.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक – ५१ विषय क्रमांक – ३

दिनांक – २०/७/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.प्रशा/२/कावि/३१७/२०१७, दि.३०/०६/२०१७
२) मा.विधी समिती ठराव क्र. १५ दि.७/७/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये ग्रामपंचायत सेवेमधून वर्ग झालेल्या कर्मचा-यांपैकी १० वर्ष सेवा पूर्ण न झालेल्या तथापि दहा वर्ष सेवा पूर्ण होण्यासाठी एक वर्षापर्यंत कमी सेवा कालावधी असलेल्या कर्मचा-यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव व पदनाम | मनपाकडील नियुक्ती दिनांक | | मनपामधील एकूण सेवा |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. भालेकर सदाशिव घमाजी, शिपाई | ०३/१२/१९९७ | | ९ वर्षे २९ दिवस |
| २. | श्री.बिडकर तुकाराम बन्सी, शिपाई | ०३/१२/१९९७ | | ९ वर्षे २ महिने २९ दिवस |

श्री.भालेकर सदाशिव घमाजी यांनी त्यांचे दि. -/०७/२०१५ चे पत्रात (दि.१९/१०/२०१५ रोजी आवक) नमूद केलेल्या बाबी व त्या अनुषंगाने केलेले मागणीचे अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील १० वर्षे सेवा पुर्ण होणेचे दृष्टीने मा.शासनामार्फत श्री.भालेकर सदाशिव घमाजी व श्री.बिडकर तुकाराम बन्सी यांच्या सेवेत भर घालण्यास मान्यता दिल्यास सदर कर्मचा-यांना निवृत्ती वेतन व इतर आर्थिक फायदे अदा करणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आर्थिक भार उचलणेस तयार असलेबाबत व प्रकरणी शासनाचे अभिप्राय / मार्गदर्शन मिळणेकामी इकडील पत्र क्र.प्रशा/०२/कावि/१७६/२०१६ दि.०२/०५/२०१६ अन्वये शासनास पत्र दिले आहे. त्यावर शासनाने पत्र क्र.पीसीसी-३०१६/प्र.क्र.३४८/नवि-२२ दि.२५ ऑक्टोबर,२०१६ अन्वये कळविले आहे **की "मा.शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व नियम तपासून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने प्रस्तुत प्रकरणी महानगरपालिकेच्या स्तरावर उचित निर्णय घ्यावा, तथापि कोणताही निर्णय घेतल्यामुळे समस्या उद्भवणार नाही याची दक्षता घ्यावी "**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन)नियम १९८२ मधील प्रकरण ५ (अर्हताकारी सेवा) मधील ५४(२) मध्ये खालीप्रमाणे तरतूद आहे. **" सेवानिवृत्त होणा-या शासकीय कर्मचा-याने निवृत्तीवेतनासाठी केलेल्या अर्हताकारी सेवेच्या कालावधीमध्ये, शासन सामान्यत:एक वर्षाहून**

**अधिक नसेल इतक्या मुदतीची भर घालू शकेल आणि ही मुदत या नियमाच्या तरतूदीनुसार निवृत्तीवेतनासाठी हिशेबात घेता येईल."**

प्रस्तुत प्रकरणी शासनाने यापूर्वी मनपास दि.२५/१०/२०१६ चे पत्रान्वये वरीलप्रमाणे मार्गदर्शन केले आहे. त्यामध्ये शासनाने प्रस्तुत प्रकरणी महापालिकेनेच त्यांचे स्तरावर उचित निर्णय घेणेबाबत कळविले आहे. त्यामुळे श्री. भालेकर सदाशिव घमाजी, शिपाई (सेवानिवृत्त) व श्री.बिडकर तुकाराम बन्सी, शिपाई (सेवानिवृत्त) यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील १० वर्ष सेवा पूर्ण होणेचे दृष्टीने व निवृत्तीवेतनाकरीता किमान सेवा कालावधी पूर्णहोणेच्या दृष्टीने या दोन्ही कर्मचा-यांना निवृत्तीवेतन अदा करणेसाठीचा आर्थिक भार उचलण्यास महानगरपालिका तयार असल्यास या दोन कर्मचा-यांच्या सेवेत एक वर्षापर्यंत भर घालणे अथवा शिथिल करणेस व तदनंतर निवृत्तीवेतन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पीएमपीएमएल मध्ये अतिरीक्त असलेले कर्मचारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वर्ग केलेले होते. सदरचे कर्मचारी पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये वर्षानुवर्षे काम करत होते परंतु या कर्मचा-यांना पुन्हा पीएमपीएमएल मध्ये बोलावून घेतले आहे. तथापि सद्या महापालिकेमध्ये कर्मचा-यांची कमतरता भासत आहे. तरी या पीएमपीएमएल कर्मचा-यांच्या सेवा पुनश्च: महानगरपालिकेमध्ये वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.आरती चोंधे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ५२ विषय क्रमांक – ४

दिनांक – २०/७/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.स्वभाअक/३/कावि/११४/२०१७ दि.५/०७/२०१७

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान" च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु २८७,०३,०००/- व ५,०३,९१,०००/- असे एकुण र. रु ७,९०,९४,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु.८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/६/२०१७ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहितीखालील प्रमाणे

**प्रपत्र“अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १०८१७ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | ९६०५ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ६२३७ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ५४६९ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ५०६७ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ३६१ सीटस | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | १७५सीटस | महिला –९४ सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष –८१ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ५४६९ लाभार्थी | GOI+GOM=३२८.१४ लाख | GOI=२०००/-व GOM=४०००/-हिस्सा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ULB =१०९.३८ लाख | ULB =२०००/-<br>हिस्सा |
| | **एकुण** | **४३७.५२ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला<br><br>दुसरा हप्ता | ३९७२ लाभार्थी | GOI+GOM=२३८.३२<br><br>लाख | GOI=२०००/-व<br><br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =७९.४४ लाख | ULB =२०००/-<br>हिस्सा |
| | **एकुण** | **३१७.७६ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत येत आहे.

**मा.निर्मला कुटे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** विषयाच्या संदर्भात बोलावे.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. चर्चा करत असताना विषय क्रमांक ३ ला मंजूरी कशी काय दिली.

**मा.महापौर-** एकाला बोलण्यासाठी संधी दिलेली आहे. योगेश बहल बोलतात, बाकीचे सुध्दा बोलणार आहेत. मंगलाताई तुम्ही खाली बसावे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. सदस्य बोलत असताना विषय कसा काय मंजूर करता.

**मा.महापौर-** विषय क्रमांक ४ मंजूर.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

(सभागृहात गोंधळ)

**मा.आरती चोंधे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ५

दिनांक – २०/७/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील

जा.क्र.प्रअक/३/कावि/२६४/२०१७ दि.५/०७/२०१७

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ६७(अ) अन्वये प्रत्येक महानगरपालिकेने लगतपूर्ववर्ती शासकीय वर्षासंबंधिचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल शासनाकडून वेळोवेळी विहीत करण्यात येईल, अशा पध्दतीने दरवर्षी ३१ जुलै पूर्वी मा.महापालिका सभेकडे सादर करणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१६-१७ चा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या डी.पी.एस.आय.आर. या मार्गदर्शक तत्वानुसार सर्व आवश्यक माहिती संबंधित विविध विभागाकडून संकलित करुन त्यानुसार तयार करण्यात आला आहे. सदर प्रारुप अहवाल मा.महापालिका सभेस सादर करावयाचा आहे.

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१६-१७ चा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल नजीकच्या मा.महापालिका सभेसमोर ठेवणेत येत आहे.

**मा.निर्मला कुटे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.
**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.
**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.
**मा.महापौर -** विषय क्रमांक ५ सभासदांना अभ्यास करण्यासाठी तहकूब करणेत येत आहे.
यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ५३ विषय क्रमांक – ५
दिनांक – २०/७/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.प्रअक/३/कावि/२६४/२०१७ दि.५/०७/२०१७

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

(सभागृहात गोंधळ)

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ५४ विषय क्रमांक – ६
दिनांक – २०/७/२०१७ विभाग- मा.नगरसचिव

**<u>विधी समिती</u>**

अ) दि.१९/०५/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.०२/०६/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.१६/०६/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.डब्बू आसवाणी-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ५५ विषय क्रमांक – ७

दिनांक – २०/७/२०१७ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>**

अ) दि.०६/०६/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.२०/०६/२०१७ व दि.२२/०६/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.डब्बू आसवाणी-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ५६ विषय क्रमांक – ८

दिनांक – २०/७/२०१७ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

अ) दि.२३/०५/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१३/०६/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.२७/०६/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.डब्बू आसवाणी-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.राजू मिसाळ** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ५७ विषय क्रमांक – ९

दिनांक – २०/७/२०१७ विभाग- मा.नगरसचिव

<u>मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती</u>

**अ) दि.२६/०५/२०१७** चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ब) दि.०९/०६/२०१७** चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.डब्बू आसवाणी-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.मंगला कदम -** मा.महापौर तुम्ही लोकांच ऐकूण घेता तुम्ही घाबरता.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** सर्वांना चर्चा करण्यासाठी वेळ देण्यात येत आहे. जे काही शहरातील प्रश्न असतील त्यावर चर्चा करायची आहे सगळयांनी जागेवर बसून घ्यावे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, तुम्ही घाबरता.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** मी स्वत:चेच अधिकार वापरलेले आहेत. आम्हांला कोणीही शिकवू नये, सर्वांना बोलण्यासाठी वेळ दिला जाईल. तुम्हांला सुध्दा प्रत्येकवेळेला बोलण्यासाठी वेळ दिलेला आहे. ज्यावेळेला हात वर कराल त्याचवेळेस प्रत्येकाला बोलू दिल जाईल. तुम्ही चर्चा करु शकता परंतु तुम्ही पहील्यांदा खाली बसावे. जोपर्यंत खाली आपण बसणार नाहीत तोपर्यंत चर्चा होणार नाही. रितसर हात वर करावे प्रत्येकाला बोलण्यास दिले जाईल. ज्यांना बोलायच त्यांनी हात वर करा.

**मा.मंगला कदम –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ज्यावेळेला एखादा सदस्य उभा राहील्यानंतर विषयांतर म्हणजे खुप काही बोलले म्हणून विषयांतर झाल. तासंनतास विषयांतर केलतर ते विषयांतर होतं.

**मा.महापौर-** तुम्ही विषय सोडून बोलू नका. तुम्ही विषयाला धरुन बोला. तुमचा काय विषय आहे त्याला धरुन बोला. तुम्ही प्रत्येक गोष्ट आम्हांला शिकवू नका.

**मा.मंगला कदम –** मा.महापौर साहेब, तुम्ही ज्या शाळेतून शिकून गेलात त्या तालमीमध्ये तुम्हांला असं शिकवल नव्हतं. त्या तालमीमध्ये तुम्ही तसं शिकलेल नाहीत. म्हणून महापौरांनी महापौरांच्या खुर्चीवर बसल्यानंतर स्वत:चा सन्मान ठेवावा.

**मा.महापौर-** तुम्ही फक्त विषयावर बोला माझे अधिकार शिकवायची गरज नाही. तुम्ही विषयाला धरुन बोला.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** आम्ही ज्या पार्टीत होतो त्या पार्टीतून आम्ही सभात्याग करुन गेलेलो आहे. तुम्ही विषयाला धरुनच बोलावे. माझे काय अधिकार आहेत ते तुम्ही मला शिकवायची गरज नाही. तुम्ही विषयावरती बोला बाकीच बोलू नका.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, आता जी मी बोलते तो विषयपत्रीकेवरील विषय नाही. सभागृहात जनरल बोलण्यासाठी उभे आहोत.

**मा.महापौर-** शहराचे जे काही विषय आहेत त्या संबंधीत बोला आमचे अधिकार तुम्ही आम्हांला सांगू नका एवढच सांगायच आहे. रिंगरोडवर चर्चा करायची आहे त्यावर बोला.

(सभागृहात गोंधळ)

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, आम्हांला रिंगरोडवर चर्चा करायची आहे, आम्हांला स्वाईन फ्ल्यूवर चर्चा करायची आहे, आम्हांला आरोग्यावर चर्चा करायची आहे.

**मा.महापौर-** याच विषयावर तुम्ही बोला बाकी बोलू नका.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, तुमचे अधिकार आम्हांला माहीती आहेत, आम्ही सुध्दा त्या खुर्चीवर आडीच वर्षे बसलेलो आहोत. आम्हांला त्या खुर्चीच महत्व सांगायची आवश्यकता नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** माझ्या अधिकाराची तुम्हांला काय तक्रार माझी करायची ती करा. तुम्ही फक्त विषयावर बोलानां. विषयावर चर्चा करु. रिंगरोडची आम्हांला सुध्दा काळजी आहे. त्यामुळे तुम्ही फक्त विषयावर चर्चा करा.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, सभागृहात भिञा शब्द वापरला.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, याच्यापेक्षा वाईट शब्द सभागृहाने ऐकलेत. तुम्हांला कोणती भीती वाटते तुम्ही विषय लगेच मंजूर करता.


(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** आपण रिंगरोडवर नंतर चर्चा करु सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे मी जाहीर करतो.

-----

**(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/९/कावि/३१८/२०१७
दिनांक - २७/०७/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.